**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांक: 27.12.2025** **वार:शनिवार**

---

1. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार युवा पिढीतील शौर्य, धैर्य आणि संवेदनशीलतेला प्रोत्साहन देणारा ठरेल, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन
2. छत्रपती संभाजीनगरच्या अर्णव महर्षि याला राष्ट्रपतींच्या हस्ते राष्टीय बाल पुरस्कार प्रदान
3. दहशतवाद हा मानवतेचा सर्वात मोठा शत्रु असून प्रत्येकानं त्याविरोधात लढण्याचं केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांचं आवाहन
4. एच वन बी व्हिसामधील अडचणी दूर करण्यासाठी अमेरिकेसोबत चर्चा सुरू आणि
5. महिला टी-20 क्रिकेटमध्ये भारताची श्रीलंकेवर विजयी आघाडी

**<u>बाल पुरस्कार</u>**

प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल हा पुरस्कार युवा पिढीतील शौर्य, धैर्य आणि संवेदनशीलतेला प्रोत्साहन देणारा ठरेल, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. वीर बालदिनानिमित्त राष्ट्रपतींच्या हस्ते काल देशातल्या 20 मुलांना प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. या मुलांच्या संकल्प आणि प्रयत्नांमुळे 2047 पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकार होईल असा विश्वास राष्ट्रपतींनी यावेळी व्यक्त केला. पुरस्कारार्थींमध्ये मध्ये 9 मुलं आणि 11 मुलींचा समावेश आहे. यापैकी दोघांना हा पुरस्कार मरणोत्तर प्रदान करण्यात आला.

विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानासाठी छत्रपती संभाजीनगरमधल्या 17 वर्षीय अर्णव महर्षीला राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. अर्धांगवायूच्या रुग्णांच्या हातांसाठी AI-आधारित पुनर्वास उपकरण आणि ॲक्टिव्ह हँड रिस्ट बँड त्यानं तयार केले आहेत. पुरस्कार स्वीकारल्यानंतर आपल्या भावना व्यक्त करताना अर्णव म्हणाला....

**ये इनोवेशंस मेरे खुद के रिकवरी के प्रोसेस के थ्रोग डेवलप हुआ है। मैं खुद पैरालाइज्ड था मेरे डोमिनेंट राइट साइड पे और ये जो इनोवेशंस है पैरलाइज पेशेंट्स और सेरेब्रल पॉलिसी पेशेंट्स के लिए बना है उनके इंप्रूव उनकी रिकवरी को फास्ट करने के लिए और बेटर करने के लिए और मैं मेरा फ्यूचर तो मैं यही देखता हूँ इसे और लार्ज स्केल पे डिप्लॉय करने के लिए और इसे हर एक पेशेंट को एक्सेस देने के लिए और एक्सेसिबल बनाने के लिए।**

**पंतप्रधान-वीरबाल दिवस**

राष्ट्र उभारणीच्या कामी युवा पिढीला केंद्रस्थानी ठेवत युवा सक्षमीकरणावर भर देऊन नवी धोरणं आखली जात आहेत, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते काल नवी दिल्लीत राष्ट्रीय वीर बाल दिवस कार्यक्रमात बोलत होते. प्रत्येक क्षेत्रात युवा पिढीसाठी नवीन संधी निर्माण होत असल्याचं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. मुलं ही विकसित भारताचं भविष्य आणि निर्माते असल्याचं सांगून महिला सक्षमीकरण आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी मुलांच्या कामाचं कौतुक केलं. देशातील सर्व मुलांना विकसित भारताच्या प्रवासात योगदान देण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**वीरबाल दिवस-मुख्यमंत्री**

साहिबजाद्यांच्या धैर्यानं आणि बलिदानानं भारतीय इतिहासाला नवी दिशा दिली असून, त्यांचं शौर्य पिढ्यान्‌पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. मुंबईत वीर बाल दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते काल बोलत होते.

**सचिव परिषद**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आणि उद्या नवी दिल्लीत होत असलेल्या सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांच्या पाचव्या राष्ट्रीय परिषदेचं अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. ही परिषद कालपासून सुरू झाली आहे. राष्ट्रीय विकास प्राधान्यांवरील संरचित आणि शाश्वत संवादाद्वारे केंद्र आणि राज्यांमधील भागीदारी मजबूत करणे हे या तीन दिवसांच्या परिषदेचं उद्दिष्ट असून ही परिषद 'विकसित भारतासाठी मनुष्यबळाचं महत्व' या संकल्पनेवर केंद्रित आहे.

**अमित शहा**

दहशतवाद हा मानवतेचा सर्वात मोठा शत्रु असून प्रत्येकानं मिळून त्याविरोधात लढणं गरजेचं आहे असं आवाहन केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. देशातला दहशतवाद निपटून काढण्यासाठी केंद्र सरकार कठोर पावलं उचलत आहे असंही त्यांनी सांगितलं. राष्ट्रीय तपास यंत्रणा अर्थात एनआयएतर्फे आयोजित दहशतवादविरोधी परिषदेचं उद्घाटन काल शहा यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत राष्ट्रीय सुरक्षिततेवर परिणाम करणाऱ्या मुद्द्यांवर, दहशतवादामुळे निर्माण होणाऱ्या धोक्यावर आणि भविष्यातील धोरणांवर सखोल विचारमंथन केलं जाणार आहे.

**जयस्वाल**

भारतीय नागरिकांना एच वन बी व्हिसा मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्या याकरता अमेरिकेबरोबर चर्चा सुरू असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल नवी दिल्लीत झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं. या अडचणींमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडत असल्यानं, अमेरिकेच्या संबंधित विभागांना यासंदर्भात पत्र लिहून कळवण्यात आलं आहे अशी माहिती

त्यांनी दिली. बांगला देशात अल्पसंख्य समाजाचा छळ होत असल्याबद्दल भारतानं तीव्र चिंता व्यक्त केली आहे असं त्यांनी सांगितलं. कॅनडात भारतीय विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याप्रकरणी भारतीय अधिकारी त्याच्या कुटुंबाशी तसंच स्थानिक प्रशासनाबरोबर संपर्कात आहेत अशी माहितीही त्यांनी दिली.

**<u>सोमालिया</u>**

सोमालियाची राजधानी मोगादिशूमध्ये नुकतंच नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी मतदान झालं. सोमालियामध्ये सुमारे 50 वर्षांनी राष्ट्रीय स्तरावर निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांची पूर्वतयारी म्हणून नगरपालिका निवडणुका घेण्यात आल्या. सोमालियामध्ये 1969 नंतर थेट निवडणूक झालेली नाही. मोगादिशूमधली युद्धजन्य परिस्थिती गेल्या काही वर्षांत सुधारली असली, तरी अल कायदा पुरस्कृत दहशतवादी संघटनांच्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर निवडणुका घेता येतील का, याची चाचपणी करण्यासाठी नगरपालिका निवडणुका झाल्या.

**<u>टॅक्स</u>**

विकसित भारताचं लक्ष्य समोर ठेवून कररचनेमध्ये केलेल्या बदलांसाठी 2025 हे वर्ष लक्षणीय ठरलं आहे. भारतीय करांचा प्रवास मीठावरील करासाठी महात्मा गांधींनी केलेल्या मीठाच्या सत्याग्रहापासून सुरू होतो. सुमारे 50 वर्षांपूर्वी प्राप्तीकरामध्ये भरमसाठ वाढ झाल्यामुळे करचुकवेगिरीत वाढ झाली होती. मात्र वस्तु आणि सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे वेगवेगळ्या टप्प्यावरची कर आकारणी बंद झाली आहे. या वर्षी 18 टक्के कराची मर्यादा 5 टक्क्यांपर्यंत कमी करण्यानंतर नागरिकांच्या मनात विश्वासाची भावना निर्माण झाली आहे. या वर्षी दिवाळीमध्ये नागरिकांनी केलेली भरभरून खरेदी आणि त्यातून जमा झालेला महसूल हे त्याचंच प्रतीक आहे. रोजच्या वापरातील वस्तु आणि विम्यावर शून्य कर यामुळे सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**<u>रेल्वे</u>**

येत्या 5 वर्षात मुंबईसह एकंदर 48 मोठ्या शहरांमधून सुटणाऱ्या रेल्वे गाड्यांची प्रवासी क्षमता दुप्पट करण्याचं नियोजन रेल्वेनं केलं आहे. उपनगरी आणि लांब पल्ल्याच्या, अशा दोन्ही गाड्यांच्या प्रवासी क्षमतेत ही वाढ होणार आहे. त्यासाठी नियोजन करण्याच्या सूचना रेल्वे मंडळाचे अध्यक्ष सतीश कुमार यांनी सर्व विभागीय रेल्वे कार्यालयांना दिल्या आहेत. त्यासाठी शहरी भागात नवीन टर्मिनलची उभारणी करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे.

**<u>रेशीम</u>**

महाराष्ट्र शासनाच्या रेशीम संचालनालयामार्फत 2025-26 या आर्थिक वर्षात हमी भावाने खरेदी करण्यात आलेल्या रेशीम धागा निर्मितीकरिता आवश्यक असणाऱ्या तुती बीजकोष आणि रिलिंग कोष यासाठी सुमारे 94 लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. वस्त्रोद्योग विभागामार्फत काल

याबाबतचा शासन आदेश जारी करण्यात आला. या शासन निर्णयामुळे बीजकोष उत्पादक शेतकऱ्यांची भांडवली गरज भागविण्यास मदत होणार असून, पुढील बीजकोष उत्पादनासाठी प्रोत्साहन मिळणार आहे.

**राष्ट्रपती-दौरा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून गोवा, कर्नाटक आणि झारखंडच्या चार दिवसांच्या दौऱ्यावर जात आहेत. कर्नाटकातील कारवार बंदरातून उद्या त्या पाणबुडीतून जाण्याचा अनुभव घेणार आहेत. या दौऱ्यादरम्यान इतर कार्यक्रमांबरोबरच त्या झारखंडमधील जमशेदपूर इथं ओल चिकी संहितेच्या शताब्दी महोत्सवाला उपस्थित राहणार आहेत.

**क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये, काल रात्री तिरुअनंतपुरम इथं झालेल्या तिसऱ्या टी-20 सामन्यात, भारतानं श्रीलंकेचा आठ खेळाडू राखून पराभव केला आणि पाच सामन्यांच्या मालिकेत 3-0 अशी निर्णायक आघाडी घेतली. 113 धावांच्या लक्षाचा पाठलाग करताना, शफाली वर्माच्या 42 चेंडूत नाबाद 79 धावांच्या जोरावर भारतानं 13 षटकं आणि 2 चेंडूत 115 धावा केल्या. रेणुका सिंग ठाकूरनं चार खेळाडू बाद केले. तिला सामनावीर घोषित करण्यात आलं.

**हवामान**

उत्तर प्रदेशात दाट धुके पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला असून पुढच्या 3 ते 4 दिवसांत हिमाचल प्रदेश, दिल्ली, पंजाब, बिहार, हरयाणामध्येही दाट धुक्याची चादर पसरली असेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. उत्तराखंड, झारखंड, बिहार आणि उत्तर प्रदेशात थंडीची तीव्र लाट येण्याचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार